महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.: तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२३-२४/२०२४/ई-ऑफीस प्रणालीद्वारे

**<u>महत्वाचे परिपत्रक</u>**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) महाडीबीटी संकेतस्थळावरील दिनांक ०५.०२.२०२४ रोजीचा डॅशबोर्ड.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. १८/तंशिसं/ईबीसी/२०२४/४८ दिनांक ०२.०२.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणा-या शिष्यवृत्ती योजनांसाठी ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेला नाही अशा पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत मुदतीच्या आत अर्ज भरुन घेण्याबाबत आपणास यापूर्वी वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे.

सोबत जोडलेल्या दिनांक ०५.०२.२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील संस्थास्तरावर प्रलंबित अर्जाची स्थिती जोडलेली आहे. सदर डीबीटी डॅशबोर्ड तपशील संस्थांच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध आहे. **सद्यस्थितीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संस्थांकडे बरेच अर्ज तपासणीसाठी प्रलंबित (Pending at institute) असून, काही अर्ज विद्यार्थ्यांना दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात (Sent Back) आलेले आहेत. तसेच २०२२-२३ वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षी विद्यार्थ्यांकडून कमी प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले दिसून येत आहेत. यावरुन सदर योनजांचा लाभ मिळविण्याकरिता विद्यार्थ्यांची नोंदणी अत्यंत कमी प्रमाणात व अत्यंत संथ गतीने होत असून संस्थेमार्फत याकरिता कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.**

मा. संचालक, तंत्र शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक यांचे सोबत वेळोवेळी बैठका घेऊन सदर योजनांचा आढावा घेतला असता या योजनेचा लाभ घेणेबाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे किंवा विद्यार्थ्यांकडून नोंदणी करुन घेण्यास संस्थास्तरावर उदासीनता दिसून येत असून संस्थाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता सर्व शिष्यवृत्ती योजनांना आवश्यक निधी पूर्णपणे उपलब्ध करुन दिला असून, सर्व निधी याच आर्थिक वर्षात ३१ मार्च २०२४ पूर्वी खर्च करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थाचालक व प्राचार्यांना कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत (EBC) आपापल्या संस्थेतील सर्व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंदणी दि. १५ फेब्रुवारी २०२४ पूर्वी करुन घ्यावी तसेच प्राप्त सर्व अर्जांची लगेच छाननी करुन पुढील मान्यतेस्तव या विभागीय कार्यालयाकडे महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात यावेत. या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास व दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत नोंदणी व छाननी अभावी पात्र विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाचालक व प्राचार्य यांची असेल याची नोंद घ्यावी.

**<u>महत्वाची सूचनाः</u>**

१. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (MahaDBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

२. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

३. **संबंधित शिष्यवृत्ती योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करत नसतानाही विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेकडून मंजूर करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास याबाबत संस्था प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

४. महाडीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज तपासणी करतेवेळी या विभागीय कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे कि, संस्थांकडून शिष्यवृत्तीचे अर्ज व्यवस्थित तपासून पुढे पाठविले जात नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज अपूर्ण/चूकीची कागदपत्रे सादर केली म्हणून संस्थेकडे परत पाठविले जातात अश्या अर्जांवर कागदपत्र पूर्ततेची कोणतीही कार्यवाही न करता तसेच विभागीय कार्यालयाकडे पाठविले जातात. ज्या संस्थांकडून अशा बाबी वारंवार घडतील अशा संस्थांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याकरीता संचालनालयाकडे शिफारस करण्यात येईल याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : महाडीबीटी पोर्टलवरील दि. ०५.०२.२०२४ रोजीचा डॅशबोर्ड.

प्रत :

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीस्तव.
२. प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.



Signed by
Dattatray Vyankatrao Jadhav
Date: 05-02-2024 16:11:37

# Directorate of Technical Education, MS Mumbai

**DBT Dashboard [Last Report Updated: 05-02-2024 07:47:14]**

F.Y.2023-2024

| Department | Scheme | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Directorate of Technical Education | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 31,408 | 3,075 | 28,333 | 6 | 4,405 | 5,388 | 18,480 | 2,670 | 2,718 |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 90,152 | 9,440 | 80,712 | 145 | 12,445 | 42,562 | 25,394 | 36,759 | 5,803 |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 3,729 | 323 | 3,406 | 3 | 300 | 1,628 | 1,473 | 1,211 | 417 |
| | **Total:** | **125,289** | **12,838** | **112,451** | **154** | **17,150** | **49,578** | **45,347** | **40,640** | **8,938** |